# प्रेसनोट

दि. १६/०६/२०२३

सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालय, वेल्हे येथील लिपीकावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | वेल्हे पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ६०/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, ७ अ. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ५५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | पंढरीनाथ मच्छिंद्रनाथ तमनर, लिपीक, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, वेल्हे, ता. वेल्हे, जि. पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- २९/०५/२०२३.
गुन्हा दाखल दिनांक :- १६/०६/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे सावकारी लायसन्स मिळविण्याच्या कामासाठी सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालय, वेल्हे येथे गेले असता, त्या कार्यालयातील लिपीक पंढरीनाथ तमनर यांनी लायसन्ससाठी लागणारा प्रस्ताव तयार करून, जिल्हा निबंधक कार्यालयात पाठपुरावा करून लायसन्स मिळवून देणेसाठी ३०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक पंढरीनाथ तमनर (लिपीक) यानी सावकारी लायसन्ससाठी लागणारा प्रस्ताव तयार करून, जिल्हा निबंधक कार्यालयात पाठपुरावा करून लायसन्स मिळवून देणेसाठी ३०,०००/- रुपये व त्यांचे स्वत:साठी २०,०००/- रुपये असे एकूण ५०,०००/- रुपये लाचेची मागणी केली व मागणी केलेली रक्कम अन्य व्यक्तीच्या बॅक खात्यामध्ये भरण्यास सांगितली म्हणुन वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला असून, त्यामध्ये त्याना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.